महाराष्ट्राचे निडर दैनिक
# शौर्य मराठी
RNI-MAHMAR/2023/89125


## दिन विशेष...
१८४३ : मराठीतील पहिले श्रेष्ठ संगीत नाटककार व किर्लोस्कर नाटक मंडळीचे संस्थापक अण्णासाहेब किर्लोस्कर यांचा जन्मदिन.
१८६७ : प्रार्थना समाजाची स्थापना.
१९४२ : हिन्दी स्वातंत्र्य संघाची स्थापना.
१९६६ : रशियाने पहिला मानवनिर्मित 'ल्युना १०' अवकाशात सोडला.

सेन्सेक्स ७१,९४७.५५ -१,६३५.६७ (२.२२%)
डॉलर ₹ ९४.६५

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३९ | २३ |
| दिल्ली | ३१ | २१ |
| मुंबई | ३४ | २५ |
| नागपूर | ३८ | २३ |
| पुणे | ३८ | १८ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | मंगळवार , दि. ३१ मार्च २०२६ | वर्ष २ रे | अंक १३९ किंमत : ५ रु. | पाने ४




महावीर जयंतीच्या मंगलमय शुभेच्छा!

## सुविचार
आयुष्य ही एक कला आहे; प्रत्येक अनुभव, सुख, दुःख, यश, अपयश हे आपल्या चित्रावरील रंग आहेत. आपल्या चित्राला सुंदर बनवा, त्याला अर्थपूर्ण बनवा.

सूर्योदय - सूर्यास्त
स.-६:२२ संध्या-६:४२

**सोने – चांदी**
सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,५१,०५५/- २,४५,०००/-

# इराणच्या क्षेपणास्त्र हल्ल्यात कुवेतचा वीज प्रकल्प खाक

## या हल्ल्यात एका भारतीय कर्मचाऱ्याचा मृत्यू

वृत्तसंस्था । तेहरान

**संपूर्ण मध्य पूर्व अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धाचे तप्त वातावरणात आहे. त्यात कुवेतमध्ये एका वीज केंद्रावर झालेल्या इराणी हल्ल्यात एका भारतीय कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला. या हल्ल्यात एका इमारतीचेही नुकसान झाले. कुवेतच्या वीज आणि जल मंत्रालयाने याला दुजोरा दिला.**





कुवेतच्या वीज, जल आणि ऊर्जा मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे की, ही घटना रविवारी संध्याकाळी घडली. कुवेतने या घटनेचे वर्णन देशाविरुद्धच्या इराणच्या आक्रमकतेचा एक भाग असे केले आहे.

मंत्रालयाच्या निवेदनात म्हटले आहे की, कुवेतमधील एका वीज प्रकल्पाच्या सेवा इमारत आणि जलशुद्धीकरण केंद्रावर झालेल्या इराणी हल्ल्यात एका भारतीय कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला आणि इमारतीचे मोठे नुकसान झाले आहे.

ऊर्जा मंत्रालयाने सांगितले की, या घटनेनंतर सुरक्षा अधिकारी आणि तांत्रिक पथकांनी, मदत आणि बचाव पथकांसह, संबंधित संस्थांच्या सहकार्याने, बाधित स्थळ सुरक्षित करण्यासाठी आपत्कालीन योजनांनुसार आपल्या कामाला सुरुवात केली आहे.

### ➤ इराण युद्धामुळे कुवेतचे मोठे नुकसान
अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धामुळे कुवेतचेही मोठे नुकसान झाले आहे. इराणने मध्य पूर्वेतील अमेरिकेचे तळ आणि पायाभूत सुविधांना लक्ष्य केले आहे. एका स्वतंत्र निवेदनात, कुवेतच्या संरक्षण मंत्रालयाने म्हटले आहे की, सुमारे महिनाभरापूर्वी युद्ध सुरू झाल्यापासून देशावर एकूण ३०७ बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे, दोन क्रूझ क्षेपणास्त्रे आणि ६१६ ड्रोन हल्ले झाले आहेत. दरम्यान, कुवेतच्या संरक्षण मंत्रालयाने रविवारी माहिती दिली की, त्यांनी गेल्या २४ तासांत १४ बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आणि १२ ड्रोन शोधून निष्प्रभ केले आहेत.

### अफवांकडे दुर्लक्ष करण्याचे आवाहन
मंत्रालयाने जनतेला शांतता राखण्याचे आणि अफवांकडे दुर्लक्ष करण्याचे आवाहन केले आहे. त्यांना केवळ अधिकृत स्त्रोतांकडून मिळणाऱ्या माहितीवरच अवलंबून राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. घडामोडींविषयी सतत आणि अचूक माहिती देण्याचे आश्वासनही देण्यात आले आहे.

# एकनाथ खडसेंसह मुलगी शारदा खडसेंवर फसवणुकीसह अॅट्रासिटीचा गुन्हा दाखल

## साखर कारखाना उभारणीच्या नावाखाली महार वतनाची जमीन हडपली

प्रतिनिधी । जळगाव



**राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) ज्येष्ठ नेते आमदार एकनाथ खडसे आणि त्यांची मुलगी शारदा चौधरी यांच्यावर जिल्ह्यातील बोदवड पोलीस ठाण्यात फसवणुकीसह अॅट्रासिटीचा गुन्हा दाखल झाला आहे. बाप-लेकीने भुसावळ तालुक्यात प्रस्तावित साखर कारखान्यासाठी खरेदी केलेल्या जमिनीच्या प्रकरणात गैरप्रकार करुन फसवणूक केल्याची तक्रार एका मागासवर्गीय महिलेने केल्यानंतर पोलिसांनी ही कारवाई केली. त्यामुळे जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.**

### यांच्यावर झाला गुन्हा दाखल
**चमेलाबाई तुकाराम तायडे यांच्या तक्रारीवरून आमदार एकनाथ गणपत खडसे, त्यांची मुलगी शारदा एकनाथ खडसे, मध्यस्थ इसम सुधाकर निनू पाटील तसेच बोदवड येथील दुय्यम निबंधक कार्यालयातील तत्कालीन अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर गुरनं ५४/२०२६ अंतर्गत बीएनएस २०२३ चे कलम ३१८ (४), ३१६ (२), ३३६(२), ३३६ (३), ४०, ३ (३) या कलमांसह अनुसुचीत जाती-जमाती प्रतिबंधक कायदा १९८९ मधील कलम ३ (१) (एफ) आणि ३ (१) (जी) अंतर्गत बोदवड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.**

भुसावळ तालुक्यातील मानपूर शिवारात २००२ मध्ये सहकारी साखर कारखाना उभारण्याच्या नावाखाली काही शेतजमिनींची खरेदी करण्यात आली होती. या व्यवहारातील गट क्रमांक १२२ ही महार वतनाची शेतजमीन मानपूर येथील चमेलाबाई तुकाराम तायडे आणि त्यांच्या वारसांच्या मालकीची होती. जमीन खरेदीच्या वेळी तायडे कुटुंबाला योग्य मोबदला देण्याचे तसेच प्रस्तावित तापी-पुर्णा सहकारी साखर कारखान्यात रोजगार उपलब्ध करून देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. याच अनुषंगाने तायडे कुटुंबाला एकनाथ खडसे यांच्याकडून ५१ हजार रुपये आगाऊ देखील मिळाले होते. त्यानंतर तायडे कुटुंबातील सदस्यांचे अंगठे घेऊन बोदवड येथील दुय्यम निबंधक कार्यालयात जमिनीचा व्यवहारही पूर्ण करण्यात आला होता. मात्र, उर्वरित रक्कम मिळावी, यासाठी तायडे कुटुंबाने वारंवार पाठपुरावा करूनही त्यांना पूर्ण मोबदला देण्यात आला नाही. दुसरीकडे, अनेक वर्षे उलटूनही संबंधित जागेवर सहकारी साखर कारखाना उभारण्यात आला नाही. दरम्यान, २०२५ मध्ये तायडे कुटुंबाने या प्रकरणाची चौकशी केली (पान २ वर)

## थोडक्यात



### थलपती विजय यांचा पेराम्बूरमधून शंखनाद!
**पेराम्बूर ।** तमिळनाडूच्या राजकारणात सुपरस्टार थलपती विजय यांनी सोमवारी अधिकृतपणे चेन्नईतील पेराम्बूर विधानसभा मतदारसंघातून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी आयोजित भव्य रोड शोमध्ये त्यांनी सत्ताधारी डीएमके सरकारवर दुष्ट शक्ती म्हणून जोरदार टीका केली आणि आगामी २३ एप्रिल रोजी होणाऱ्या निवडणुकीत आपल्या तमिळगा वेत्री कळघम (टीव्हीके) पक्षाच्या शिट्टी या चिन्हासमोर मतदान करून बदल घडवण्याचे आवाहन केले. उमेदवारी अर्ज भरल्यानंतर खुल्या जीपमधून जनतेला संबोधित करताना विजय कमालीचे आक्रमक दिसले. ते म्हणाले की, तामिळनाडू सध्या अमली पदार्थांचा विळखा आणि ढासळलेली कायदा व सुव्यवस्थेमुळे धोक्यात आला आहे.



### सुट्टीच्या दिवशी तब्बल १०३ निर्णय जारी
**मुंबई ।** आर्थिक वर्ष संपत आल्याने राज्य सरकारने रविवारी सुट्टीच्या दिवशीही तब्बल १०३ शासन निर्णय अर्थात जीआर जारी केले आहेत. यातील बहुतांश निर्णय हे निधी आणि अनुदान वाटपासंदर्भात असल्याचे दिसून येते. आर्थिक वर्ष २०२५-२६ची सांगता मंगळवारी होणार आहे. त्याआधी यंदाच्या वर्षातील निधी वाटपाला मंजुरी देण्यासाठी त्यासंदर्भातील प्रस्तावांना शासन निर्णयांच्या माध्यमातून मंजुरी देणे आवश्यक आहे. त्यानुसार या वर्षातील निधी, प्रस्ताव मार्गी लावण्यासाठी विविध विभागांची लगबग सुरू आहे. निधी वितरणाच्या प्रस्तावांवर मान्यतेची मोहोर उमटवण्यासाठी शासन निर्णय जारी करण्याचा धडाका सरकारकडून सुरू आहे.

# नाशिकमध्ये अंनिसची राज्यस्तरीय बुवाबाजी विरोधी संघर्ष परिषद

वृत्तसंस्था । नाशिक

**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने राज्यस्तरीय फलज्योतिष आणि बुवाबाजी विरोधी संघर्ष परिषद ३ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता येथील खुटवड नगरातील सीटु भवनात आयोजित करण्यात आल्याची माहिती राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे आणि राज्य प्रधान सचिव डॉ. ठकसेन गोराणे यांनी दिली आहे.**




परिषदेचे उद्घाटन खा. वर्षा गायकवाड यांच्या हस्ते होणार आहे. परिषदेत प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, सेवानिवृत्त पोलीस उपायुक्त बाबासाहेब बुधवंत, मानसोपचार तज्ज्ञ डॉ. जयंत ढाके, डी. एल. कराड, अॅड. रंजना गवांदे, दादा चांदणे, महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे राज्य अध्यक्ष माधव बावगे, राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे मार्गदर्शन करणार आहेत. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने ३६ वर्षात हजारो बुवाबाबांचे काळे कृत्य उघडकीस आणले आहे. संघटनेच्या प्रयत्नामुळेच जादूटोणा (पान २ वर)

# जळगावला वादळी पावसाचा तडाखा

प्रतिनिधी । जळगाव

गेल्या दोन तीन दिवसांपासून वातावरणात प्रचंड उकाडा जाणवत होता. उष्णतेने अंगाची लाहीलाही झाली आहे. तत्पूर्वी ३० मार्चला खान्देशसह राज्यात पावसाचा अंदाज वर्तवला होता. त्याप्रमाणे सायंकाळी ५:३० वाजेच्या दरम्यान वातावरणात अचानक गारवा पसरला. ढगांचा कडकडात सुरू होऊन जोरदार पावसाला सुरवात झाली. त्यामुळे चाकरमाने आणि रस्त्यावरील विक्रेत्यांची धावपळ उडाली. मिळेल त्या ठिकाणी नागरिक आसरा घेत होते, दुचाकीस्वारांची देखल तारांबळ उडाली. काही ठिकाणी पाण्याचे तळे साचले होते. पुढील दोन दिवस पाऊस पडणार असा अंदाज कृषी विभागानं दिला होता, त्याप्रमाणे शेतकऱ्यांची उघड्यावरील पिके झाकण्यासाठी धावपळ उडाली.

# रुपाली चाकणकरांना अटक होणार?

वृत्तसंस्था । नाशिक

**भोंदूगिरी, महिलांचे शोषण आणि आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपांमध्ये अटकेत असलेल्या अशोक खरात प्रकरणात तपास वेगाने पुढे जात आहे. या प्रकरणात आता रुपाली चाकणकर यांच्याभोवतीही संशयाची सुई फिरू लागल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.**



विशेष तपास पथक ने आता आपला तपास शिवनिका संस्थेकडे वळवला आहे. अशोक खरातने स्थापन केलेल्या या संस्थेमार्फत मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार आणि विविध कार्यक्रम राबवले गेल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या संस्थेशी संबंधित सर्व आजी-माजी पदाधिकाऱ्यांची सखोल चौकशी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, या चौकशीसाठी काही सदस्यांना समन्स बजावण्याची प्रक्रिया सुरू असून, शिवनिकाशी संबंधित असल्यामुळे रुपाली चाकणकर यांनाही चौकशीसाठी बोलावले जाऊ शकते. मात्र, त्यांच्या अटकेबाबत अद्याप कोणतीही अधिकृत पुष्टी झालेली नाही. दरम्यान, खरात प्रकरणामुळे चाकणकर यांना आधी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा आणि त्यानंतर राष्ट्रवादी महिला प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. खरातसोबत इतर काही राजकीय नेत्यांचे फोटोही व्हायरल झाल्याने या प्रकरणाची व्याप्ती अधिक वाढली आहे. विरोधकांकडून या प्रकरणात सहभागी असलेल्या सर्वांवर कठोर कारवाईची मागणी होत असून, खरातला पाठबळ देणाऱ्या राजकीय नेत्यांचीही चौकशी करावी, असा दबाव वाढत आहे.

या पार्श्वभूमीवर आता आर्थिक व्यवहार, निधीचा वापर आणि संभाव्य राजकीय पाठबळ या सर्व अंगांनी तपास करत आहे. येत्या काही दिवसांत शिवनिका संस्थेतील अनेक पदाधिकाऱ्यांची चौकशी आणि शक्य तितकी कारवाई होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. एकूणच, रुपाली चाकणकर यांना अटक होणार का याबाबत अद्याप स्पष्टता नसली तरी च्या हालचालींमुळे या प्रकरणाला नवं वळण मिळालं असून राज्याचं लक्ष या तपासाकडे लागलं आहे.

# 'लिव्ह-इन'मधील जोडप्याला 'विवाहित' म्हणून ग्राह्य धरणार

## केंद्र सरकारने घेतलेल्या नवीन निर्णयानुसार, आगामी जनगणनेत नवीन नियम होणार लागू

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**आता लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या जोडप्यांची गणना देखील 'विवाहित' म्हणून केली जाणार आहे. या निर्णयामुळे देशातील सामाजिक आकडेवारी संकलित करण्याच्या पद्धतीत मोठा बदल होणार आहे.**



२०२७ च्या जनगणनेसाठी तयार करण्यात आलेल्या नवीन नियमावलीत लिव्ह-इन जोडप्यांना वेगळ्या श्रेणीत न ठेवता त्यांना विवाहित जोडप्यांच्या समकक्ष मानले जाईल.

आतापर्यंत जनगणनेमध्ये केवळ कायदेशीररित्या विवाहित असलेल्या लोकांचीच नोंद 'विवाहित' म्हणून केली जात असे.

मात्र, बदलत्या सामाजिक परिस्थितीचा विचार करून सरकारने हा निर्णय घेतला आहे.

जर जोडपे बऱ्याच काळापासून एकत्र राहत असेल, तर ते वैवाहिक स्थितीखाली अर्ज भरू शकतात. ही जनगणना डिजिटल स्वरूपातही उपलब्ध आहे, ज्यामुळे लोकांना स्वयं-गणना पोर्टलद्वारे आपली माहिती ऑनलाइन भरता येते.

बदलती सामाजिक रचना लक्षात घेऊन हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे, जेणेकरून अशा नात्यांनाही अधिकृत मान्यता मिळू शकेल आणि जनगणनेच्या माहितीत त्यांचा समावेश होऊ शकेल.

### स्पष्ट सूचना सार्वजनिकरित्या जाहीर
**या विषयावर स्पष्ट सूचना सार्वजनिकरित्या जारी करण्याची ही पहिलीच वेळ असली तरी, अधिकाऱ्यांच्या मते ही पद्धत पूर्वीच्या जनगणनेतही पाळली जात होती. पूर्वीच्या जनगणनेत, जर एकत्र राहणाऱ्या जोडप्याने स्वतःला विवाहित घोषित केले, तर त्यांची तशी नोंद केली जात असे. ही माहिती जनगणनेच्या 'घर-यादी प्रक्रिया या टप्प्यात ३३ प्रश्नांद्वारे गोळा केली जाते, जो टप्पा अंदाजे ४५ दिवस चालतो. या प्रक्रियेत विविध सामाजिक आणि आर्थिक बाबींवर माहिती गोळा केली जाते, ज्यामध्ये एका घरात राहणाऱ्या विवाहित जोडप्यांच्या संख्येचा समावेश असतो.**

# माऊलींच्या पालखीचा मुक्काम हलणार?



वृत्तसंस्था । पुणे

**संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे ठिकाण बदलू नका, अशी मागणी करत, आम्ही तेथे असलेल्या त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न करू असे आश्वासन निवडुंगा विठोबा देवस्थान संस्थानचे विश्वस्त आणि नगरसेवक विशाल धनवडे यांनी संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा समितीला केले आहे. भवानी पेठेतील पालखी विठोबा मंदिरात ज्ञानेश्वर महाराजांची पालखी दरवर्षी मुक्कामी येते. हे ठिकाण अत्यंत अडचणीचे ठरत आहे. सुरक्षा आणि एकूणच गर्दीच्या दृष्टीने ते सोयीचे नाही.**

या कारणास्तव पालखी एसपी कॉलेजच्या किंवा टिळक रस्त्यावरील न्यू इंग्लिश स्कूलच्या मैदानात मुक्कामी आणावी का, याविषयी पालखी सोहळा समितीत विचार सुरू आहे. त्याला धनवडे यांनी विरोध केला आहे. ठिकाण बदलण्याचा निर्णय घेण्यात येत असल्याचे समजले. हा निर्णय ऐकून आम्हा सर्व वारकरी भाविकांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे, (पान २ वर)

शौर्य मराठी
महाराष्ट्राचे निडर दैनिक
epaper.shauryamarathi.com



## संपादकीय

### टीकेची सवय

इराणने पाच देशांच्या जहाजांना होर्मुझ सामुद्रधुनीतून जाण्यास परवानगी दिली. ही पाच आपली मित्र राष्ट्रे असल्याचे इराणचे म्हणणे आहे. या पाच राष्ट्रांत भारताचाही त्यांनी समावेश केल्यामुळे इराणच्या मनात भारताच्या विरोधात कोणती कटुता नाही हे सिद्ध होते. त्याचाच अर्थ असाही होतो की भारत गेल्या दहा–बारा वर्षांपासून आपल्या परराष्ट्र धोरणात जे काही कथित बदल अथवा प्रयोग करत आहे. त्यात इराणला काही खटकले नाही. तसे जर असते तर त्यांनी भारताला होर्मुझ जलमार्गातून जाण्याची सूट दिली नसती. हे सगळे उघड सत्य आहे. हे जगाला जसे दिसते आहे तसे ते भारतातील विरोधी पक्षांनीही व विशेषत: काँग्रेसने समजून घेणे आवश्यक आहे. त्यांनी सरकारला चुकीच्या बाबींत लक्ष्य जरूर करावे, तथापि, जेव्हा आपत्कालीन स्थिती असते तेव्हा सरकारच्या बाजूने किमान त्यावेळी तरी उभे राहण्याचे पथ्य पाळायला हवे. दोष आणि उणिवा दाखवायला नंतर भरपूर वेळ मिळणार आहे. टीका करण्याची सवय प्रत्येक वेळी उपयुक्त ठरत नाही. अमेरिका आणि इस्रायलने हल्ला केल्यानंतर प्रत्युत्तर म्हणून इराणने होर्मुझ मार्ग रोखून धरला. त्यांची ही कृती शत्रूचे नाक दाबणारी ठरली. मात्र, त्यांच्या याच कृतीमुळे अन्य देशांनाही अचानक संकटाचा सामना करावा लागतो आहे. ज्यांची इराणविरूद्धच्या युद्धात अमेरिका आणि इस्रायलच्या बाजूने प्रत्यक्ष भागीदारी नाही ते देशही युद्धात भरडले जात आहेत. संवादाच्या मार्गाने प्रश्न सोडवला जावा, अशी भूमिका काही देशांनी मांडली आहे. वास्तविक युद्ध थांबवण्याचे काम संयुक्त राष्ट्रांचे आहे. तो निस्तेज पडला किंबहुना ती संघटनाच गतप्राण झाली आहे. भारतानेही चर्चेतून तोडगा काढण्याचे आवाहन केले आहे. आपल्या विरोधकांच्या बाजूने प्रत्यक्ष मैदानात नसलेल्या देशांना त्यामुळेच इराणने होर्मुझचा पास दिला आहे. अर्थात इराणने हा निर्णय गुरुवारी घेतला असला तरी त्याच्याही अगोदर भारताची चार जहाजे होर्मुझमधून आली होती. याचाच अर्थ अगदी सुरुवातीच्या टप्प्यातही भारत इराणच्या शत्रूंच्या यादीत नव्हता किंवा भारताबाबत त्यांच्या मनात संशय नव्हता. हा झाला आंतरराष्ट्रीय घडामोडींचा मामला. आता याच विषयावर देशात काय घडते आहे त्याचाही विचार करू. तसे केल्यावर कोणाचे काय चुकते आहे व कोणी काय दुरूस्ती केली पाहिजे ते ठरवता येईल. भविष्यात अशा प्रकारच्या चुका टाळण्यासाठी तो अनुभव असेल. आखातातील संघर्षाची ओरड भारतात सातत्याने सुरू असल्यामुळे आणि विविध आरोपांच्या फैरी झाडल्या जात असल्यामुळे भारत सरकारनेही विरोधकांना विश्वासात घेण्यासाठी एक सर्वपक्षीय बैठक घेतली. नेहमीप्रमाणे पंतप्रधान स्वत: या बैठकीपासून अलिप्त राहिले व राजनाथसिंह या ज्येष्ठ मंत्र्याला बैठकीत सरकारची बाजू मांडण्याची जबाबदारी दिली. त्यांच्यासोबत जयशंकरही होते. पंतप्रधान असे लांब का राहतात याचे सर्वोत्तम उत्तर तेच देऊ शकतील. असो. इराण–अमेरिकेचा संघर्ष सुरू झाल्या दिवसापासून हे भारताच्या कूटनीतीचे अपयश आहे असे आरोप काँग्रेस पक्षाकडून होत आहेत. भारतच या युद्धाला जबाबदार आहे असे काँग्रेसला वाटते का हे कळायला मार्ग नाही, मात्र त्यांचे प्रवक्ते जे बोलत आहेत त्यातून त्यांना हेच सूचित करायचे असल्याचे दिसते. भारताचीही युद्धात भूमिका आहे, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष त्यात सहभाग आहे असाच आभास निर्माण केला जातो आहे. गमतीची बाब अशी की स्वयंपाकाचा गॅसची टंचाई आणि अफवांमुळे मध्येच अचानक पेट्रोल–डीझेलसाठी करावी लागलेली धावपळ या जाचाव्यतिरिक्त सर्वसामान्य भारतीय आखातातील या संघर्षाकडे तटस्थपणे पाहतो आहे. एक देश म्हणून भारताचे या संघर्षाशी काही देणेघेणे नाही असेही प्रत्येकाला वाटते आहे. मात्र काँग्रेस आणि त्यांचे मित्रपक्ष ते मानायला तयार नाहीत. सरकारचे नेमके काय चुकले आहे हे तरी त्यांनी सांगितले पाहिजे.

# क्रिकेटचा महा-थरार! जळगाव क्रिकेट लीग ऑक्शनमध्ये संघांची तुफान झुंज!

## ऑक्शनचा जल्लोष; सहा संघात १५६ खेळाडू अन् ऑलराऊंडरांसाठी ऑक्शनमध्ये रंगलेली जबरदस्त लढत!

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने व रतनलाल सी. बाफना ज्वेलर्स यांच्या प्रायोजकत्वाखाली आयोजित जळगाव क्रिकेट लिग–२०२६ या स्पर्धेत क्रिकेटचा महा–थरार सहा संघांमध्ये रंगणार आहे.**



शुभम शर्मा (आयकॉन), मोहम्मद सैफ, ऋषी यादव, मानव टिबरेवाला, अजय पाटील, यशवंत शिंदे, सतीश चतुर्वेदी, रोहित पारधी, केशव ठाकूर, आर्यन पाटील, निनाद पाटील, रोहित भोई, टिंकू राठोड, जाकीर तडवी, इसरार मोहम्मद, सर्वेश गुळवे, गौरव ठाकूर, सूरज जाधव, राहुल निंभोरे (प्रशिक्षक) तर सागर पार्क सीसी चाळीसगाव चार्जर्स ओम मुंडे (आयकॉन), साई बनाईत, साहिल गायकर, लोकेश पाटील, शाहरुख शेख, सुरज पाटील, अमेय कोळी, अभिषेक पाटील, अमेय पवार, मितांशु सोनवणे, प्रणव जाधव, योगेश पाटील, मिलिंद सपकाळे, दिनेश ढाकणे, कार्तिक बाटुंगे, कृष्णा ढगे, वकार शेख, रोशन भडांगे, सचिन सोनवणे (प्रशिक्षक), दाल परिवार जळगाव किंग्स जगदीश झोपे (आयकॉन), बिपिन चांगरे, राज बेलदार, उबेद खाटिक, मोहम्मद नदिम, मनीष चव्हाण, मेहुल इंगळे, क्रिष धंडोरे, अक्षय मेघानी, पुर्वेश चौधरी, विराज मंधवानी, जितेंद्र नाईक, राकेश बाविस्कर, सागर भावसार, इमरान पठाण, चिन्मय पोळ, गौरव वाघ, सिद्धार्थ तायडे, घनश्याम चौधरी (प्रशिक्षक) तर ऋषभ मेटल अ‍ॅण्ड केमिकल्स जामनेर ब्लास्टर्स शतायू कुलकर्णी (आयकॉन), प्रद्युम्न महाजन, रामकृष्ण गुरुचरण, क्रिषी नथानी, मासूम खाटिक, ललित पाटील, योगेश तेलंग, कुणाल शर्मा, प्रतीक शिंदे, मानस पाटील, विवेक महाजन, नितलेश चौधरी, मयूर चव्हाण, चेतन वानखेडे, अतुल मोरे, रोहन पाटील, वंश पाटील, अर्शद खान, मुश्ताक अली (प्रशिक्षक), एस.के.ट्रान्सलाईन पाचोरा टायटन्स तर सचिन चौधरी (आयकॉन), पवन पाटील, रोहित तलरेजा, सिद्धेश देशमुख, कैलास पाटील, विशाल शिरसाठ, निलेश एस. पाटील, वीरेन पाटील, कार्तिक मारवाडी, यश अग्रवाल, श्लोक महाजन, राज केसी, निखिल दुरांडे, कैलास पांडे, चारुदत्त नन्नावरे, जय शर्मा, स्वप्निल सुर्यवंशी, प्रतीक पवार, पंकज महाजन (प्रशिक्षक) आणि एम. व्ही. जे. इंटस्ट्रीयल कन्सलन्टशी रावेर रॉयल्स– नचिकेत ठाकूर (आयकॉन), अनुज पवार, धवल हेमनानी, सचिन पाटील, नेहल अहमद, संदेश सुरवाडे, सज्जाद अहमद, अक्षय कोल्हे, आर्यन नथानी, मोहम्मद नोमान, आदित्य वाणी, कृष्णा माळी, तौसिफ मिर्झा, प्रज्वल पाटील, सोहम जैन, अशफाक शेख, तनवीर अहमद (प्रशिक्षक) यांचा देखील सहभाग राहणार आहे.

> प्लॅटिनम, डायमंड, गोल्ड आणि १९ वर्षाखालील गटातील तब्बल १५६ खेळाडूंवर ऑक्शनमध्ये बोली लागली. यावेळी ऑलराऊंडर खेळाडूंसाठी फ्रॅंचायझींमध्ये तुफान चढाओढ पाहायला मिळाली. क्रिकेटप्रेमींसाठी ही लीग एक रोमांचक पर्व ठरणार असून प्रत्येक संघाने ऑलराऊंडर खेळाडूंवर आपली पर्स पॉकेट आजमावून संघ भक्कम केला आहे. ऑक्शननंतर संघांची रचना जाहीर झाली असून प्रत्येक संघात दमदार खेळाडूंचा समावेश आहे. जैन हिल्सच्या परिश्रम हॉलमध्ये पार पडलेल्या या ऑक्शनमध्ये तांत्रिक बाजू अभंग जैन, जगदीश चावला, वरूण देशपांडे, हितेश पटेल, समीर गुळवे, उदय सोनवणे, संदीप गांर्गेुळे, सुयश बुरूकूल, प्रशांत विरकर व मोहम्मद फजल यांनी सांभाळली. तर ऑक्शनर म्हणून अ‍ॅड. सुरज जहाँगिर यांनी दमदार शैलीत संपूर्ण वातावरण रंगवले.

## पहिली वर्ग शिक्षकांची कार्यशाळा

प्रतिनिधी । शिरपूर

पंचायत समिती शिरपूर शिक्षण विभाग अंतर्गत शिरपूर बीट नंबर १ तर्फे इयत्ता पहिली वर्ग शिक्षकांची कार्यशाळा एसआरबी इंटरनॅशनल स्कूल, दहिवद येथे घेण्यात आली. कार्यशाळेचे उद्घाटन शिक्षण विस्तार अधिकारी अनिल बाविस्कर यांच्या हस्ते झाले. शिरपूर नंबर १ बीट मध्ये एक एप्रिलपासून इयत्ता पहिलीच्या वर्ग सुरू करण्याचा उपक्रम शिक्षण विस्तार अधिकारी अनिल बाविस्कर यांच्या मार्गदर्शनाने राबविला जात आहे. माझे बीट निपुण बीट या संकल्पनेतून जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था प्राचार्य जयश्री पाटील, शिक्षणाधिकारी मनीष पवार व गटविकास अधिकारी प्रदीप पवार व गटशिक्षणाधिकारी डॉ. नीता सोनवणे यांच्या प्रेरणेने सदर कार्यशाळा घेण्यात आली.

# व्यवस्थेला आरसा दाखविणारे साहित्य चिरकाल टिकते

## ग्रंथोत्सव आयोजित कवी संमेलनात डॉ.मिलिंद बागुल यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । जळगाव

**सामान्य माणसाच्या दु:ख वेदनेला आपल्या साहित्यातून मांडत व्यवस्थेच्या अनेक अन्यायकारक गोष्टी समाज व्यवस्थेसमोर आणत व्यवस्थेला आरसा दाखविणारा खऱ्या अर्थाने कवी किंवा साहित्यिक असतो. माणसाच्या जगण्याच्या, जीवनाचा विचार ज्या साहित्यातून आत्मभान निर्माण करीत असतो. असे साहित्य चिरकाल टिकणारे असते, असे प्रतिपादन डॉ. मिलिंद बागुल यांनी केले.**

जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय जळगाव व वल्लभदास वालजी जिल्हा वाचनालय जळगाव यांच्या संयुक्त विद्यामाने आयोजित जळगाव ग्रंथोत्सवात कवी संमेलनाच्या अध्यक्षपदावरून ते बोलत होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. सत्यजित साळवे यांनी केले. याप्रसंगी सादर करण्यात आलेल्या कवितांना रसिकस्रोत्यांनी भरभरून दात दिली. चोपड्याचे कवी राजेंद्र पारे यांनी सजग असायला हवं या कवितेतून वास्तव परिस्थितीवर कविता सादर केली. आसाराम, रामरहिम तसाच खरातही जाईल समाज मनावर कारण दुसरा ठग्या तयार आहे ठाण मांडूनी




आपल्या उरावर. कवी संमेलनाला प्रा. संध्या महाजन यांच्या कवितेने सुरुवात झाली बाई नावाचे मायेचे आभाळ या कवितेतील खालील ओळींनी त्यांनी सुरुवात केली. बाईला माहेरातील गणगोताचे प्रेमळ मायेने दाटून आलेले आभाळ आठवले ना... की... एक.. एक.. सय येते मृदगंधित होऊन अन मग बरसतो धो धो पाऊस...ज्योति वाघ यांनी आपल्या गझलेतून वास्तव मांडले. होते कधीतरी ते नाते गहाळ झाले, जंगल मनातले मग ओसाड माळ झाले, अंधारल्या दिशेला जाऊ नकोस आता कारण तुझ्याचसाठी मी बघ सकाळ झाले निंबावरी उगवले ते रोप पिंपळाचे सांभाळले जसे की त्याचेच बाळ झाले. गझल श्रोत्यांच्या टाळ्यांच्या प्रतिसादाने बहारदार झाली. माझा शेतकरी दादा सोसतसे दुःख झळा, कोणासही नाही दया, कापतात सर्व गळा असे दु:ख कवयित्री ज्योति राणे यांनी शेतकरी दादा कवितेतून मांडले. कवी विलास मोरे यांनी आपल्या गझलेतून सामाजिक वास्तव मांडले. गावात रोज त्यांची होतात कीर्तने पण भोंदूस काय द्यावे, साधूच बाटलेला माणूस जात माझी ठरवून मी निघालो शाळेत दाखलाही जातीत वाटलेला. कवयित्री शितल पाटील यांनी लेवा गणबोलीतली कोन? कविता सादर केली. प्रा.डॉ.सत्यजित साळवे यांनी आयुष्याच्या उन्हातान्हात तपतात मुली खपतात मुली आपुलकीचं नातं कसं अलगद जपतात मुली.. मुली म्हणजे वेली..पाना फुलात फुलणारी हिरवी.. हिरवी बोली...यावरील ओळीतून मुलींचे यथोचित असे चित्र उभे केले. कवी संजय साळुंखे यांनी चवदार तळ्याचे पाणी या कवितेतून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या सामाजिक क्रांतीचे वर्णन मांडले. या कविसंमेलनात राहुल निकम, राजेंद्र पाटील, शंकर भांबेरे, घनश्याम सोनवणे यांनी सहभाग घेतला. अतिथी कवींचा जिल्हा ग्रंथालय अधिकारी चंद्रशेखर ठाकूर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास ग्रंथपाल अनिल अत्रे व अनेक रसिक श्रोते उपस्थित होते. सूत्रसंचालन बापूराव पानपाटील यांनी केले.

# सतपंथ चॅरिटेबल ट्रस्टतर्फे आरोग्य शिबिरात फळवाटप

प्रतिनिधी । फैजपूर

**कुंभारखेडा येथे १६ ते २४ मार्च दरम्यान आयोजित करण्यात आलेला फिरता नारळी सप्ताह उत्साहात पार पडला. या सप्ताहानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले असून, भाविकांनी त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.**

महामंडलेश्वर जनार्दन हरीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित शिबिरात रक्तदान तसेच आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी नरेंद्र नारखेडे व रवींद्र पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. सतपंथ चॅरिटेबल ट्रस्टतर्फे महामंडलेश्वर जनार्दन हरीजी महाराज यांच्याहस्ते उपस्थितांना फळवाटप करण्यात आले. शिबिरात अनेक नागरिकांनी आरोग्य तपासण्या करून घेतल्या. उपस्थित डॉक्टरांनी रुग्णांची तपासणी करून त्यांना मोफत औषधांचेही वितरण केले.

याशिवाय, पांडुरंग सराफ यांच्याहस्ते भाविकांना १ हजार ज्ञानेश्वरी ग्रंथांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे धार्मिक आणि सामाजिक जाणीव वाढीस लागल्याचे चित्र दिसून आले.

# कॅन, बाटलीसह ड्रममध्ये इंधन देण्यास पेट्रोलपंप चालकांना सक्त मनाई

प्रतिनिधी । धुळे

**जिल्ह्यातील पेट्रोल पंप चालकांना कोणत्याही प्रकारच्या कॅन, बाटल्या, ड्रम इत्यादींमध्ये इंधन देण्यास सक्त मनाई करण्यात येत आहे, अशा आशयाचे आदेश जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी निर्गमित केले आहेत.**

जिल्ह्यात पेट्रोल व डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. मात्र, समाजमाध्यमांवरील अफवांमुळे नागरिकांची पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी होत असून नागरिकांच्या रांगा लागत आहेत. त्यामुळे मागणी व पुरवठा यामध्ये तात्पुरता असमतोल निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक हिताच्या दृष्टीने व इंधनाचा पुरवठा सुरळीत आणि सुनिश्चित करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, जीवनावश्यक वस्तू अधिनियमांतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून आदेश देण्यात आले आहेत. कोणत्याही प्रकारच्या कॅन, बाटल्या, ड्रम आदींमध्ये इंधन देण्यास सक्त मनाई करण्यात येत आहे. नागरिकांनी अनावश्यक गर्दी व रांगा टाळून आवश्यकतेनुसारच इंधन घ्यावे, प्रत्येक पेट्रोल पंप चालकाने दररोज पंपावर उपलब्ध असलेला शिल्लक साठा, त्या दिवशी प्राप्त झालेला साठा व मागणी केलेला साठा याची माहिती दर्शनी भागात फलकावर प्रदर्शित करणे बंधनकारक राहील.

# धुळ्यातील ओम गॅस एजन्सीला कारणे दाखवा नोटीस जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांच्याकडून एजन्सीची पाहणी

प्रतिनिधी । धुळे

**ग्राहकांना घरगुती वापराच्या गॅस सिलिंडरचा पुरवठा विहीत कालमर्यादेत न करणे आणि ग्राहकांची प्रतीक्षा यादी मोठी असल्याबद्दल जिल्हा पुरवठा अधिकारी संजय बागडे यांनी धुळे येथील ओम गॅस एजन्सीच्या संचालकांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. तसेच जिल्हा पुरवठा अधिकारी श्री. बागडे यांनी संबंधित गॅस एजन्सीला भेट देवून पाहणी केली.**

जिल्ह्यात घरगुती वापराच्या गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत व्हावा म्हणून जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांच्या मार्गदर्शनाखाली नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आला होता. या कक्षाकडे संबंधित एजन्सीच्या सेवेबाबत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींची दखल घेत जिल्हा पुरवठा अधिकारी श्री. बागडे, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी अर्चना भगत, पुरवठा निरीक्षण अधिकारी हर्षा महाजन, पुरवठा कर्मचारी शिरीष पवार, श्री. खैरनार, रवींद्र भदाणे आदींनी आज दुपारी गॅस एजन्सीला भेट देवून पाहणी केली. त्यानंतर कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. या नोटिसीत म्हटले आहे की, ग्राहकांच्या मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त होत आहेत. गॅस सिलिंडरची नोंदणी केल्यानंतर विहीत कालावधीत सिलिंडरचा पुरवठा केला जात नाही. याबाबत ग्राहकांमध्ये आपल्या एजन्सीमार्फत देण्यात येणाऱ्या सेवेबाबत असंतोष आहे. त्यानुसार आज दुपारी चौकशीकामी भेट दिली असता कार्यालय बंद आढळून आले. आपल्या कर्मचाऱ्यांशी संपर्क केल्यावर कार्यालय उघडण्यात आले. २२०० ग्राहकांनी सिलिंडरसाठी नोंदणी केली आहे. मात्र, त्यांना अद्यापही सिलिंडरचा पुरवठा केलेला नाही. २५ दिवसांपासूनची प्रतीक्षा यादी प्रलंबित आहे. येत्या दोन दिवसांत ३५० सिलिंडर येणार आहेत. त्यामुळे प्रतीक्षा यादीतील सर्व ग्राहकांची सिलिंडरची गरज भागणार नाही.

## पान १ वरुन

**एकनाथ खडसेंसह मुलगी......**

असता, सदर जमीन शारदा एकनाथ खडसे यांच्या नावावर नोंद झाल्याचे समोर आले. या प्रकारामुळे धक्कादायक स्थिती निर्माण झाली. यानंतर तायडे कुटुंबाने रिपाइं (आठवले) गटाचे जिल्हाध्यक्ष अनिल अडकमोल यांच्याकडे मदत मागितली. अडकमोल यांनी प्राथमिक पडताळणी केली असता जमीन शारदा खडसे यांच्या नावावर असल्याचे स्पष्ट झाले. या पार्श्वभूमीवर रिपाइंच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे अधिकृत तक्रार दाखल करण्यात आली. दरम्यान, ११ फेब्रुवारी २०२६ रोजी मूळ खरेदी खताची प्रत तपासली असता धक्कादायक बाब समोर आली. या दस्तऐवजात खाडाखोड करून खरेदीदार म्हणून नमूद असलेल्या 'तापी–पुर्णा शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज' या नावाच्या जागी 'शारदा एकनाथ खडसे' असे लिहिल्याचे आढळले. तसेच खरेदीखताच्या पान क्रमांक १३ वरही अशाच प्रकारे बदल करून शारदा खडसे यांचे नाव समाविष्ट करण्यात आल्याचे निदर्शनास आले. या प्रकारामुळे संशय अधिकच बळावल्याने तायडे कुटुंबाने ९ मार्च रोजी जळगाव जिल्हाधिकाऱ्यांकडे अधिकृत तक्रार दाखल केली. तक्रारीची दखल घेत जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश पोलीस अधीक्षकांना दिले. यानंतर या प्रकरणात पुढील कारवाई म्हणून चमेलाबाई तुकाराम तायडे यांनी बोदवड पोलीस ठाण्यात औपचारिक तक्रार नोंदवली. आणि पुढील कार्यवाहीला गती मिळाली.

**माऊलींच्या पालखीचा......**

असे धनवडे यावर म्हणाले. पालखी सोहळा हा केवळ एक धार्मिक कार्यक्रम नसून, तो आमच्या श्रद्धेचा, परंपरेचा आणि भावनिक नात्याचा भाग आहे. ३५० वर्षे भवानी पेठ येथे मुक्कामी असणारा हा पालखी सोहळा आमच्यासाठी विशेष महत्त्वाचा आहे. ठिकाण बदलल्यास ३५० वर्षाची परंपरा खंडित होऊन परंपरेला धक्का बसेल, असे धनवडे यांनी समितीला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. पालखी सोहळ्याचे ठिकाण बदलण्याचा निर्णय घेऊ नये. सोहळा पूर्वीप्रमाणेच ठरलेल्या ठिकाणी आयोजित करावा, असे निवेदनात म्हटले आहे. जेथे पालखीचा मुक्काम असतो, त्याठिकाणी गर्दी होते, ही वस्तुस्थिती आहे. परंतु ३५० वर्षांची पालखी मुक्कामाची परंपरा आहे. भाविकांचे श्रद्धास्थान आहे. गर्दी नियंत्रणात आणण्यासाठी काय उपाययोजना करता येईल याबाबत पोलिसांशी बोलून त्या दूर करण्याचा निर्णय घेतला जाईल.

**नाशिकमध्ये अंनिसची......**

विरोधी कायद्याअंतर्गत काही भोंदूंना शिक्षा झाली आहे. यामध्ये वेगवेगळ्या जाती–धर्माचे भोंदू आहेत. भोंदूगिरी कशी चालते, राज्यात कोणत्या भागात भोंदू सक्रिय आहेत, यासह वेगवेगळ्या पैलुंवर राज्यस्तरीय परिषदेत चर्चा करण्यात येणार आहे. परिषदेच्या समारोपप्रसंगी लोकप्रबोधनार्थ शहरातून फेरी काढण्यात येणार आहे. शिवाजी रोडवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादनानंतर परिषदेचा समारोप ज्येष्ठ साहित्यिक तथा महाराष्ट्र अंनिसचे राज्य उपाध्यक्ष उत्तम कांबळे यांच्या भाषणाने होईल. परिषदेचे नियोजन डॉ. ठकसेन गोराणे ,विनायक सावळे, कृष्णा चांदगुडे, प्रा. आशा लांडगे, अरुण घोडेराव,सुरेश बोरसे, राजेंद्र फेगडे आदी करीत आहेत. परिषदेसाठी राज्यभरातून तीनशेहून अधिक प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# वरणगावमध्ये दुकानदारांचा पालिकेवर मोर्चा काढून ठिय्या आंदोलन

## व्यापाऱ्यांकडे लोकनियुक्त नगराध्यक्षांनी फिरवली पाठ; न. प.दालनात दुकानदारांची जोरदार घोषणाबाजी करीत संतापाचा उद्रेक

प्रतिनिधी । वरणगाव

**शहरातील दुकानदार मालमत्ताधारकांकडे असलेल्या विविध करांच्या वसुलीसाठी नगरपालिका प्रशासनाने नवनविन युक्त्या सुरु केल्या आहे. शहरातील जागा भाडेपट्टे व गाळेधारकांना थकबाकी भरा; अन्यथा मुदत संपलेल्यांनी महिना अखेर जागा खाली करा, असे लेखी पत्र देताच सोमवारी शहरातील ३०० व्यावसायीकांनी पालिकेत जाब विचारण्यासाठी मोर्चा काढून नगरपरिषदमध्ये ठिय्या आंदोलन केले.**



लोकनियुक्त नगराध्यक्ष सुनील काळे यांनी मात्र आलेल्या दुकानदाराकडे सपशेल दुर्लक्ष करून या ठिकाणी येण्याची तसदी न घेता यांच्याकडे पाठ फिरवली. त्यामुळे संतप्त दुकानदारांनी पालिकेत जोरदार घोषणाबाजी करीत ठिय्या मांडला. यावेळी सर्व व्यापाऱ्यांची एकजूट दिसून आली. या दुकानदाराचे नेतृत्व व्यापारी संघटनेचे अध्यक्ष विलास मुळे यांचे मार्गदर्शना खाली मोर्चाचे आयोजन केले होते. दि. ३० मार्च रोजी दुपारी १२ वा.सुमारास व्यापारी संघटनेचे अध्यक्ष विलास मुळे यांचे मार्गदर्शनाखाली सर्व ३०० नोटीस मिळालेल्यांनी व्यापाऱ्यांनी मोर्चा काढून पालिकेला धडक दिली असता प्रशासनाला घाम फोडला. याप्रसंगी मुख्याधिकाऱ्यांची बदली झाल्यामुळे कार्यालयीन अधिक्षक राशिद नौरंगाबादी यांनी मोर्चेकऱ्यांचे निवेदन स्वीकारून त्यांनी प्रशासनाची भूमिका स्पष्ट करत सर्वांनी थकबाकी कर भरा; पालिकेला सहकार्य करा, असे आवाहन त्यांनी केले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.– ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई–१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
**✽ कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी** (✽ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७–२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# हिंदू केवळ धर्म नसून जीवन जगण्याची पद्धत

## विशाल हिंदू मेळाव्यात ह.भ.प विलास सायगावकर यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । जळगाव

**हजारो वर्षांची परंपरा, संस्कृती, तत्त्वज्ञान आणि आध्यात्मिक विचार यांचा संगम म्हणजे हिंदू धर्म. या धर्माचे वैशिष्ट्य म्हणजे सहिष्णुता, सर्वसमावेशकता आणि मानवतेचा संदेश. हिंदू धर्माचे स्वरूप अत्यंत व्यापक आणि विशाल आहे. हिंदू धर्म हा केवळ एक धर्म नसून तो जीवन जगण्याची पद्धत आहे, असे उद्गार ह.भ.प विलास सायगांवकर यांनी काढले.**



सकल हिंदू समाज श्रद्धा कॉलनी परिसरातील अनेक उपकॉलनी आणि हाउसिंग सोसायटीच्यावतीने जाती-जातीत विखुरलेल्या हिंदू समाजाला संघटित करण्याच्या उद्देशाने जळगाव शहरात विशाल हिंदू मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. पार्वतीनगर परिसरातील श्री गणेश मंदिर आवारात, गजानन सोसायटीत आयोजित या मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून रा.स्व. संघ जळगाव जिल्हा सहप्रचार प्रमुख मनोज सावंत तर अध्यक्षस्थानी जितेंद्र लाठी, उपाध्यक्ष महेंद्रसिंग पाटील हे होते. कार्यक्रमाची सुरूवात भारत माता प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली. हभप रामायणाचार्य विलास महाराज सायगावकर पुढे म्हणाले की, या धर्मात विविध विचारधारा, उपासना पद्धती आणि तत्त्वज्ञानाला स्थान आहे. वेद, उपनिषद, पुराणे, भगवद्गीता, रामायण आणि महाभारत यांसारख्या ग्रंथांनी मानवाला सत्य, धर्म, कर्तव्य आणि आदर्श जीवनाची शिकवण दिली आहे. त्यामुळे हिंदू धर्म हा जगातील सर्वात प्राचीन आणि समृद्ध संस्कृतींपैकी एक मानला जातो. हिंदू संस्कार जन्मापासून ते मृत्यूपर्यंत १६ संस्कारांची परंपरा असून या संस्कारांमुळे व्यक्तीमध्ये नैतिकता, कर्तव्यबुद्धी, कुटुंबप्रेम आणि समाजाबद्दलची जबाबदारी निर्माण होते. शेवटी, हिंदू धर्माची महान परंपरा जपणे आणि पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे, असेही त्यांनी सांगितले. अध्यक्षीय भाषणात जितेंद्र लाठी यांनी अशा संमेलनासाठी निमंत्रण पाठवावे लागते ही शोकांतिका असून हिंदु संघटीत होण्यासाठी मार्मीक कथा सांगून समाजासाठी एकत्र येण्याचे आवाहन केले. सूत्रसंचालन प्रा.वर्षा उपाध्ये यांनी केले.

### सत्य, प्रेम, आदर हिंदू धर्माची शिकवण

संस्कार, संस्कृती आणि धर्माचे तत्व आचरणात आणल्यास समाज अधिक सुसंस्कृत आणि समृद्ध होईल, असे विचार मनोज सावंत यांनी हिंदू धर्माची शिकवण सत्य, प्रेम, आदर या आधारावर टिकून आहे. वसुधैव कुटुंबकम ही भावना हिंदू धर्माने जगाला दिली आहे. म्हणजेच संपूर्ण जग एक कुटुंब आहे, हा विचार हिंदू संस्कृतीची महानता दर्शवतो. परंतु आजच्या आधुनिक जीवनशैलीत अनेक हिंदू आपल्या धर्मग्रंथांपासून आणि शास्त्रांपासून दूर जात आहेत. हिंदू धर्माचे शास्त्र केवळ वाचण्यासाठी नसून त्यातील आचार आणि मूल्ये आचरणात आणणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे प्रत्येक हिंदूने आपल्या संस्कृतीची ओळख करून घेतली पाहिजे आणि त्या मूल्यांचे पालन केले पाहिजे. तसेच संघ शताब्दी निमित्त भारतीयांनी आचरणात पंच परिवर्तन छोट्या छोट्या मात्र देश आणि समाजात अमुलाग्र बदल घडवून आणणाऱ्या आचरणात आणण्याचे आवाहन त्यांनी केले.

# अखिल भारतीय कोळी समाज प्रदेश सचिवपदी पुन्हा ॲड. अनिल नन्नवरे यांची नियुक्ती

प्रतिनिधी । जळगाव



**अखिल भारतीय कोळी समाज (रजि.) नवी दिल्ली शाखा महाराष्ट्र राज्य कार्यकारणीत प्रदेश अध्यक्ष परेशभाई कोळी यांच्या अध्यक्षतेखाली ठाणे येथील कोळी समाज भवन येथे बैठक घेण्यात आली.**

या बैठकीत ॲड.अनिल डी.नन्नवरे यांची पुनश्च प्रदेश सचिव म्हणून नियुक्ती करुन शाल, श्रीफळ देवून गौरवण्यात आले. यावेळी राष्ट्रीय कार्याध्यक्ष ॲड. मनूभाई चावडा, राष्ट्रीय महामंत्री डी. पी. शांखवार, राष्ट्रीय उपाध्यक्ष महादेव शहाबाजकर, राष्ट्रीय सचिव पुष्पाताई मढवी आदी उपस्थित होते. ॲड.अनिल नन्नवरे गेल्या बाविस वर्षांपासून एक निष्ठतेने कार्य करत आहेत. जळगाव शहरात बाविस वर्षानंतर आदिवासी कोळी समाजाचा पहिला पूर्णपणे मोफत सामुहिक विवाह सोहळा त्यांनी यशस्वी संपन्न केलेला आहे. कोळी समाज संघटनेत प्राथमिक सदस्य, युवा जिल्हा अध्यक्ष, युवक खांदेश कार्याध्यक्ष, खांदेश उपाध्यक्ष, प्रदेश सचिव ते राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य असा त्यांचा बाविस वर्षांचा प्रवास आहे. त्यांचे निवडीचे गोपालशेठ नंन्नवरे, रविशेठ नंन्नवरे, ईश्वर शेठ, रामचंद्र सोनवणे, धनराज साळुंखे, ॲड.सागर चित्रे, ॲड.केदार भुसारी,मेजर के.एन.पाटील, भगवान कोळी आदींनी कौतुक केले.

## थोडक्यात

### कुलगुरु प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांची नियुक्ती

**जळगाव ।** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांची विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या खगोलविज्ञान व खगोलभौतिकशास्त्र आंतरविद्यापीठ पुणे केंद्राच्या परीषदेवर सदस्यपदी नियुक्ती केली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष तथा पुणे येथील खगोलविज्ञान व खगोलभौतिकशास्त्र आंतरविद्यापीठ केंद्राचे अध्यक्ष यांनी कुलगुरुंच्या प्रवर्गातून पुणे येथील केंद्राच्या परीषदेवर कुलगुरु प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांची सदस्यपदी नियुक्ती केली आहे. या आशयाचे पत्र विद्यापीठ अनुदान आयोगाचे संयुक्त सचिव डॉ.जितेंद्र त्रिपाठी यांनी निर्गमित केले. प्रा. माहेश्वरी यांची नियुक्ती पुढील दोन वर्षापर्यंत राहील.

### फैजपूर येथे शालेय क्रीडा स्पर्धेचा बक्षीस वितरण

**फैजपूर ।** शहरातील शांती विद्यामंदिर इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये शालेय क्रीडा स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ उत्साहात पार पडला. या समारंभाला प्रमुख पाहुण्या म्हणून प्रज्ञा चौधरी उपस्थित होत्या. प्रज्ञा चौधरी यांच्याहस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व पदक देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका शुभांगी महाजन यांच्यासह शिक्षकवृंद उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांचे यशाचे कौतुक केले. कार्यक्रमात प्रज्ञा चौधरी यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन सर्वेश इंगळे या विद्यार्थ्याने केले.

### सी.बी.सी.एस. पॅटर्नच्या परीक्षा ९ एप्रिलपासून

**जळगाव ।** विद्यापीठाच्या उन्हाळी २०२६ मधील सी.बी.सी.एस. पॅटर्न मधील प्रथम, व्दितीय, तृतीय वर्ष कला वर्गाच्या परीक्षा दि. ९ एप्रिलपासून सुरु होऊन २३ मे रोजी संपणार आहेत. विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या दि.२५ मार्च २०२६ रोजीच्या तातडीच्या सभेत उन्हाळयाची तीव्रता व विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन सी.बी.सी.एस. पॅटर्न मधील प्रथम, व्दितीय, तृतीय वर्ष कला वर्गाच्या कमी विद्यार्थी संख्या असलेल्या काही पूर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या संबधीत विषयांच्या परीक्षांच्या तारखांमध्ये फेरबदल केला आहे त्यामुळे या परीक्षा ३० मे ऐवजी २३ मे पर्यंत आयोजित कराव्यात असा निर्णय घेतला. या संदर्भातील सुधारीत वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केले आहे. या निर्णयाची सर्व संबंधीत विद्यार्थी, प्राध्यापक व महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी नोंद घ्यावी अशी माहिती विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. योगेश पाटील यांनी कळविले आहे.

# रोटरी जळगाव वेस्टतर्फे शीतशवपेटीचे लोकार्पण



प्रतिनिधी । जळगाव

**येथील रोटरी क्लब ऑफ जळगाव वेस्टतर्फे धरणगाव तालुक्यातील वाकटूकी येथे शीतशवपेटीचे लोकार्पण करण्यात आले.**

पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांनी उपक्रमास भेट देऊन रोटरी वेस्टच्या या समाजोपयोगी कार्याचे कौतुक केले.

यावेळी झालेल्या कार्यक्रमात बोलताना अध्यक्ष गौरव सफळे यांनी गावातील युवक मोठ्या संख्येने सैन्य दलात असून त्यांच्या परिवारातील ज्येष्ठ व्यक्तींच्या निधनानंतर त्यांना गावी पोहोचण्यासाठी खूप वेळ लागतो. त्यामुळे मृतदेहाचे सन्मानपूर्वक व सुरक्षित जतन व्हावे या हेतूने या उपक्रमाचे नियोजन केल्याचे सांगितले.

सरपंच सुरेश पाटील यांनी या शीतशवपेटीमुळे २० किलोमीटर परिसरातील सात ते आठ गावांना ज्या ठिकाणी स्मशानभूमी नाही किंवा पावसाळ्यात अंत्यसंस्कारास अडचणी येतात. त्या सर्व गावांना याचा खूप मोठा उपयोग होणार आहे असे त्यांनी सांगितले. या उपक्रमासाठी रोटरी वेस्टचे सचिन अग्रवाल, संगीता घोडगावकर यांच्यासह स्मिता बंदूकवाला, संजय इंगळे, श्रेय कोठारी, दीपक वर्मा, निलेश जैन, मयूर धुप्पड यांनी आर्थिक सहकार्य केले.

ग्रामस्थांच्या वतीने सरपंचांसह पोलीस पाटील भिका पाटील, ग्रामसेवक शामसुंदर पाटील यांनी रोटरी वेस्टच्या या उपक्रमाबद्दल अध्यक्ष गौरव सफळे यांचा कृतज्ञतापूर्वक सत्कार केला.

या कार्यक्रमास रोटरी वेस्टचे प्रशासन सचिव महेश सोनी, प्रकल्प सचिव देवेश कोठारी, ज्येष्ठ सदस्य चंद्रकांत सतरा, माजी अध्यक्ष नितीन रेदासनी, कुमार वाणी, सरिता खाचणे, योगेश राका, बिपिन काबरा, विजय श्यामनानी, अमित चांदीवाल यांच्यासह ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### भुसावळात तिकीट तपासणी मोहीम

प्रतिनिधी । भुसावळ

विनातिकीट व अनधिकृत प्रवासाला आळा घालण्यासाठी भुसावळ रेल्वे विभागाने दि.२५ मार्च रोजी विशेष मफोर्ट्रेसफ तिकीट तपासणी मोहीम राबवली. या कारवाईत ४९१ प्रकरणांत २.८२ लाखांचा दंड वसूल वसूल करण्यात आला. ही कारवाई विभागातील भुसावळ, जळगाव, नाशिक रोड, मनमाड, खंडवा, अकोला, बडनेरा, अमरावती या आठ प्रमुख स्थानकांवर एकाचवेळी करण्यात आली.

# शाळांना २ मेपासून उन्हाळी सुट्टी लागू होणार!

## शिक्षण विभागाकडून वेळापत्रक जाहीर

प्रतिनिधी । जळगाव

**उन्हाळ्याच्या सुट्ट्यांची आतुरतेने वाट पाहणाऱ्या विद्यार्थ्यांसह पालकांसाठी महत्वाची बातमी आहे. शिक्षण विभागाने उन्हाळी सुट्ट्यांचं अधिकृत वेळापत्रक जाहीर केलं. त्यानुसार राज्यातील सर्व शाळांना २ मेपासून उन्हाळी सुट्टी लागू होणार होईल.**

इतर मंडळांच्या काही शाळांमध्ये स्थानिक परिस्थितीनुसार किंवा शैक्षणिक उपक्रमांमुळे शाळा सुरू असल्यास, संबंधित शाळा प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून सुट्टी जाहीर करण्याबाबत निर्णय घ्यावा, असे शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) पुणे तसेच प्राथमिक शिक्षण संचालनालयाने परिपत्रकाद्वारे जाहीर केले. दरम्यान दरवेळी १० ते १५ एप्रिलनंतर जी उन्हाळ्याची सुट्टी सुरू व्हायची तसं न होता उन्हाळ्याची सुट्टी ही मे महिन्याच्या सुरुवातीला सुरु होणार आहे. १ मे रोजी शालेय निकाल जाहीर झाल्यानंतरच अधिकृतपणे सुट्टी सुरू होईल. यंदा सुट्टीचा कालावधीही कमी असणार आहे. जून महिन्यात शाळा नेहमीपेक्षा लवकर सुरू होणार असल्याने विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सुट्ट्यांचे दिवस कमी होणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांसह पालकांनाही आपल्या सुट्टीचे नियोजन नव्याने करावे लागणार आहे. सर्व विभागांतील शाळा १५ जूनपासूनच सुरू होणार आहे. असे आदेश शिक्षण विभागाने दिले आहे.

# वावडदे येथील सुरेश पाटील यांना आदर्श शेतकरी पुरस्कार

प्रतिनिधी । जळगाव



तालुक्यातील वावडदे येथील प्रगतिशील शेतकरी सुरेश हिम्मतराव पाटील यांनी त्यांच्या शेतात अनेक प्रकारचे प्रयोग करून कमी खर्चात अनेक वेळा जास्त उत्पन्न काढले. यांची दखल घेत कृषी विभाग, जळगाव जिल्हा परिषदतर्फे आदर्श शेतकरी पुरस्कार देण्यात आला.

सन २०२५-२६ सालासाठीचा हा पुरस्कार जळगावचे खासदार स्मिता वाघ व जळगाव पाणीपुरवठा व स्वच्छता तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, सीईओ मीनल करणवाल, रणधीर सोमवंशी, पदनाभ म्हस्के, चंद्रकांत बोरसे यांच्या हस्ते सहपरिवारास हा पुरस्कार देण्यात आला. यावेळी वावडदे येथील शिंदे गटातील शिवसेना जिल्हा उपप्रमुख नानासाहेब रवींद्र कापडणे यांच्यासह सामाजिक कृषी विभागातील वरिष्ठ अधिकारी प्रगतिशील शेतकरी, जळगाव जिल्ह्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महावीर जयंतीनिमित्त अहिंसा व्यसनमुक्ती संकल्प रॅली

प्रतिनिधी । जळगाव

**भगवान महावीर जयंतीनिमित्त भव्य अहिंसा, व्यसनमुक्ती, जीवनचित्रण संकल्प रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यात विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन व्यसनमुक्ती, सत्य, शाकाहार व शांततेचा संदेश दिला.**




महावीर जयंतीनिमित्त अहिंसा रॅलीत तंबाखू, सिगारेट, बिडी मुक्तता, शाकाहाराचे पालन, खरे बोलणे, सत्य, अहिंसा आणि जीवन शिक्षण अशा सामाजिक संदेशावर भर देण्यात आला होता. मुख्याध्यापक डॉ.विलास नारखेडे यांनी वाईट सवयींमध्ये मांसाहार व्यर्ज करणे, समाजाला अहिंसेचा मार्ग दाखवणे, व्यसनमुक्त जीवन जगण्यास प्रवृत्त करणे व भगवान महावीरांचे विचार रुजवणे हा रॅलीचा मुख्य उद्देश होता. अर्पण सेवा ट्रस्ट व पवन ट्रस्ट या पदाधिकाऱ्यांनी महावीर जयंतीबद्दल यावेळी मार्गदर्शन केले. ट्रस्टतर्फे विद्यार्थ्यांना केळी व बिस्किट वाटप करण्यात आले. या रॅलीमध्ये खुशी सोनवणे, तेजश्री जगताप, भैरवी निवतकर, आयशा तडवी, हर्षल पाथरवट, योगेश सुतार इ. विद्यार्थी तसेच विद्यालयाचे डॉ.विलास नारखेडे, समन्वयिका प्रतिभा खडके, स्वाती कोल्हे, सीमा चौधरी, डॉ.प्रतिभा राणे, संतोष पाटील, दिनेश चौधरी, राजेश वाणी, विशाल पाटील, अजय कुंवर आदी रॅलीमध्ये सहभागी होते.

# तर प्रदुषणाची जैवविविधता जपली जाईल

प्रतिनिधी । जळगाव

**अधिवासाचा ऱ्हास, प्रदुषण आणि पृथ्वीचे वाढते तापमान या तीन महत्वपूर्ण बाबींवर काम केल्यास जैवविविधता जपली जाईल, असे प्रतिपादन प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे यांनी केले.**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव संचलित आदिवासी अकादमी, नंदुरबार आणि पर्यावरण विज्ञान आणि निसर्ग संवर्धन शाळा, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने व्दिदिवसीय जैवविविधता महोत्सवाचा समारोप करतांना ते बोलत होते. यावेळी मंचावर राज्यपाल नामनिर्देशित व्यवस्थापन परिषद सदस्य व नियोजन समिती अध्यक्ष राजेंद्र नन्नवरे, व्य.प.सदस्य प्रा. पवित्रा पाटील, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, अधिसभा सदस्य रामसिंग वळवी, केदारनाथ कवडीवाले व महोत्सवाचे समन्वयक प्रा. के. एफ. पवार हे उपस्थित होते. पुढे बोलतांना प्रा.इंगळे यांनी, विविध संस्थांच्या संशोधनाचा हवाला देत ते म्हणाले की, जैवविविधतेतील लाखो प्रजाती नामशेष होत आहे. त्यांना जपण्याची गरज आहे. व्यवस्थापन परिषद सदस्य व नियोजन समिती अध्यक्ष राजेंद्र नन्नवरे यांनी आदिवासी समुदायाचे पारंपरीक ज्ञान व जैवविविधता जपण्यासाठी सामुहिक प्रयत्नातून लहान लहान वने तयार केली पाहिजे. अधिसभा सदस्य रामसिंग वळवी यांनी रानभाज्या महोत्सव, परंपरागत बीजांचे संकलन, औषधी वनस्पती आदी बाबत माहिती दिली. सूत्रसंचालन खेमराज पाटील व इशीका गुप्ता यांनी केले.

# सुवर्ण बाजारपेठेत सोने-चांदीच्या दरात चढ-उतार

## ग्राहक संभ्रमात; सुवर्ण व्यावसायिकांचीही वाढली चिंता

प्रतिनिधी । जळगाव

**गेल्या काही दिवसांपासून सोने-चांदीच्या दरात मोठे चढ-उतार सुरु आहेत. तसेच लग्नसराई, सणासुदीसाठी दागिने खरेदीच्या विचारात असलेले ग्राहक संभ्रमात पडले आहेत. या दोन्ही धातुंचे दर स्थिर होत नाही तोपर्यंत बाजारपेठेतील उलाढाल सुरळीत होण्याची चिन्हे नाही. त्यामुळे सुवर्ण व्यावसायिकांचीही चिंता वाढली आहे.**



जळगावमधील सुवर्ण बाजारपेठेत सोमवारी सोने-चांदीच्या किमती किंचित बदल लक्षात घेता बऱ्यापैकी स्थिर राहिल्याचे चित्र दिसून आले. सलग वाढीनंतर आलेली ही स्थिरता बाजारासाठी काहीशी दिलासादायक मानली जात असून, ग्राहक आणि व्यापाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाल्याचे जाणवले. जाणकारांच्या माहितीनुसार, आंतरराष्ट्रीय बाजारात गेल्या काही दिवसांत झालेल्या तेजीमुळे देशांतर्गत बाजारातील किमतींमध्येही वाढ झाली होती. मात्र, सोमवारी जागतिक बाजारातून कोणतेही ठोस संकेत न मिळाल्याने आणि डॉलर निर्देशांकातील हालचाल मर्यादित राहिल्यामुळे स्थानिक बाजारात दर स्थिर राहिले. गुंतवणूकदारांनीही सावध भूमिका घेतल्यामुळे मोठे चढ-उतार टळल्याचे स्पष्ट झाले.

दरम्यान, लग्नसराईचा हंगाम पुन्हा सुरू झाल्याने मागणी टिकून असली तरी ग्राहकांची खरेदीची गती मंदावलेली दिसत आहे. वाढत्या किमतींचा परिणाम म्हणून अनेक ग्राहक सध्या थांबून परिस्थितीचा अंदाज घेत आहेत. आगामी काही दिवसांत दरांमध्ये कोणता कल राहतो, यावर लक्ष ठेवूनच खरेदीचा निर्णय घेतला जात असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

यापूर्वी लग्नसराईच्या काळात सराफा बाजारात मोठी गर्दी दिसत असे. मात्र, यंदा वाढत्या किमतींमुळे बाजारपेठेत तुलनेने कमी वर्दळ दिसून येत आहे. सोने-चांदीचे दर आवाक्याबाहेर गेल्याने सर्वसामान्य ग्राहकांमध्ये चिंता वाढली असून, खरेदी-विक्रीचे व्यवहार मर्यादित प्रमाणात होत असल्याचेही चित्र आहे. व्यापाऱ्यांच्या मते, पुढील काही दिवसांत आंतरराष्ट्रीय बाजारातील घडामोडी, डॉलरचे चढ-उतार आणि स्थानिक मागणी यावरच किमतींचा कल अवलंबून राहणार आहे. त्यामुळे सध्या बाजारात स्थिरता जाणवत असली तरी अनिश्चिततेचे वातावरण कायम असून, ग्राहक आणि व्यापारी दोघेही सावधपणे व्यवहार करत असल्याचे चित्र आहे. शहरातील सुवर्ण बाजारपेठत सोने सोमवारी सकाळी बाजारपेठ उघडल्यावर २०६ रुपयांची किरकोळ घट नोंदवली गेली. त्यामुळे सोन्याचे दर जीएसटीसह प्रति १० ग्रॅम एक लाख ५० हजार ५८६ रुपयांपर्यंत खाली आले आहे.

### चांदीचे दर १०३० रुपयांची वाढ

**जळगाव शहरातील सुवर्ण बाजारपेठेत आठवड्याच्या शेवटच्या दिवशी शनिवारी २०६० रुपयांची वाढ झाल्याने चांदीचे दर जीएसटीसह प्रति किलो दोन लाख ३९ हजार ९९० रुपयांपर्यंत पोहचले होते. सोमवारी सकाळी बाजारपेठ उघडल्यावर पुन्हा १०३० रुपयांची वाढ नोंदवली गेली. त्यामुळे चांदीचे दर तीन टक्के जीएसटीसह प्रति किलो दोन लाख ४१ हजार २० रुपयांपर्यंत वधारले आहे.**

# नवोदय विद्यालयात विद्यार्थ्यांना कायदे व आरोग्य विषयक मार्गदर्शन

## तालुका विधी सेवा समिती व किमया बहुउद्देशीय संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आयोजन

प्रतिनिधी । भुसावळ

प्रतिनिधी तालुक्यातील साकेगाव येथील जवाहर नवोदय विद्यालय येथे तालुका विधी सेवा समिती व किमया बहुउद्देशीय संस्थेच्या संयुक्त विद्यमाने येथे आज दि. २८ मार्च रोजी कायदे व आरोग्यविषयक मार्गदर्शन शिबिर संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवोदय विद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र खंडाळे होते. यावेळी शिक्षक व शिक्षकवृंद तसेच विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



शिबिरात किमया बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा अ‍ॅड. जास्वंदी भंडारी व रिटेनर अ‍ॅड. अभिजित मेने, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सुवर्णा गाडेकर, पत्रकार उज्ज्वल्ला बागुल यांनी मार्गदर्शन केले. अ‍ॅड.जास्वंदी भंडारी यांनी पॉक्सो कायद्याविषयी विस्तृत माहिती देताना सांगितले की, कायदा , २०१२) हा भारतातील मुलांच्या (१८ वर्षांखालील) लैंगिक अत्याचारांपासून मुलांचे संरक्षणासाठी बनवलेला महत्त्वाचा कायदा आहे. मुलांवर होणाऱ्या लैंगिक गुन्ह्यांना रोखणे व पीडित मुलांना न्याय आणि संरक्षण देणे हा मुख्य उद्देश आहे जर, १८ वर्षांखालील कोणतेही मुलगा किंवा मुलगी यांना लैंगिक छळ, लैंगिक अत्याचार, वारंवार त्रास देणे, धमकी देणे आदी कोणी करीत असले तर त्याची त्वरित तक्रार करा, असे आवाहन केले. या कायद्यांतर्गत गुन्ह्याच्या प्रकारानुसार कडक शिक्षा होते तर काही प्रकरणांत आजीवन कारावास व दंड आणि तुरुंगवास दोन्ही लागू होऊ शकतो, पॉक्सो कायद्यान्वये मुलांची गोपनीयता राखली जाते. मुलाची ओळख उघड केली जात नाही. यासाठी प्रकरणे लवकर निकालासाठी जलदगती न्यायालये आहेत. पीडित जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये किंवा १०९८ वर फोन करून मदत मिळवू शकतो. अत्याचार होत असेल तर शिक्षकांना सांगावे किंवा विश्वासात जे असतील त्यांना सांगावे, असेही त्या म्हणाल्या. समाजात गुन्हे होऊ नये यासाठी कायदे असतात न्यायव्यवस्था आहे सर्वांनी दक्षता घ्या, अन्याय व अत्याचार होऊ नये, यासाठी सदैव सजग रहा, असा मौलिक सल्ला प्राचार्य राजेंद्र खंडाळे यांनी यावेळी दिला.

# बऱ्हाणपूर-अंकलेश्वर महामार्गाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यास मंजुरी

प्रतिनिधी । रावेर

**जळगाव जिल्ह्यातील रावेर तालुक्यातून मध्य प्रदेश सीमेला जोडणाऱ्या बऱ्हाणपूर-अंकलेश्वर महामार्गाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे, तसेच रावेर शहरात महिलांसाठी ठिकठिकाणी स्वच्छतागृहे उभारण्यात यावीत, या मागण्यांसाठी निळे निशाण सामाजिक संघटनेतर्फे सुरू करण्यात आलेल्या बेमुदत ठिय्या आंदोलनाला सहाव्या दिवशी ऐतिहासिक यश मिळाले.**



दि. २३ मार्चपासून रावेर तहसीलदार कार्यालयासमोर सुरू असलेल्या या आंदोलनाकडे सुरुवातीला प्रशासनाने लक्ष न दिल्याने संघटनेचे संस्थापक अध्यक्ष आनंद बाविस्कर यांनी २६ मार्चपासून अन्न-पाण्याचा त्याग करत उपोषण सुरू केले. यामुळे कार्यकर्त्यांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आणि प्रशासनाने तातडीने हालचाली सुरू केल्या.

या पार्श्वभूमीवर नगरपरिषदेत सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या संमतीनुसार बऱ्हाणपूर-अंकलेश्वर महामार्गाला अधिकृतरित्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. या निर्णयाचे स्वागत करत आनंद बाविस्कर यांनी नायब तहसीलदार संजय तायडे व मुख्याधिकारी अविनाश गांगोडे यांचे आभार मानले. मनोगत व्यक्त करताना त्यांनी सांगितले की, निळे निशाण संघटनेला मिळालेले हे यश केवळ यश नसून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा आमच्यासाठी मोठा गौरव आहे. यानंतर त्यांनी आमरण उपोषणाची सांगता केली.

या यशानंतर शेकडो समाजबांधवांच्या उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. 'जय भीम'च्या घोषणांनी परिसर दणाणून गेला. ढोल-ताशांच्या गजरात आणि फटाक्यांच्या आतषबाजीमध्ये कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला. याप्रसंगी नगरसेविका अनिता तायडे, माजी नगरसेवक जगदीश घेटे, अ‍ॅड. दीपक तायडे, पंकज वाघ, प्रदीप सपकाळे, सावन मेढे आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते. आंदोलन यशस्वी करण्यासाठी सदाशिव निकम, संजय तायडे, विलास तायडे, महेंद्र कोचुरे, नारायण सवर्णे, विक्की जाधव, उदय वाघ, गोकुळ रायमळे, विशाल तायडे, विठ्ठल गाढे, महेंद्र कावडकर, अक्षय इंगळे, दिनेश ससाणे, मोहन ससाणे, आकाश निकम, अर्जुन तायडे, नंदा बाविस्कर, संगीताबाई घेटे, सुशिला बाविस्कर, अल्का जाधव, उज्ज्वला वाघ, संध्या अटकाळे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## थोडक्यात

### आयएमए जळगाव शाखेच्या अध्यक्षपदी डॉ. बोरोले, सचिव डॉ. शाह

**जळगाव** । इंडियन मेडिकल



असोसिएशन अर्थात आयएमए जळगाव शाखेच्या अध्यक्षपदी डॉ. धनंजय बोरोले आणि सचिवपदी डॉ. पंकज शाह यांची निवड करण्यात आली आहे. डॉ. शाह हे गेल्या १० वर्षांपासून आयएमए जळगाव शाखेत कार्यकारी मंडळ सदस्य म्हणून सक्रिय आहेत. आयएमए महाराष्ट्र अवयवदान समितीचे ते को - चेअरमन आहेत. महाराष्ट्र नेत्ररोग तज्ञ सोसायटीचे ते माजी कोषाध्यक्ष आहेत. १ एप्रिल पासून सुरु होणाऱ्या कार्यकाळा साठी नूतन कार्यकारिणी घोषित करण्यात आली आहे. त्यात कोषाध्यक्ष म्हणून डॉ. पंकज पाटील तर सल्लागार म्हणून डॉ. अनिल पाटील, डॉ. विलास भोळे, डॉ. स्नेहल फेगडे यांचा समावेश आहे. कार्यकारिणीत डॉ. राहुल मयूर, डॉ.किशोर पाटील, डॉ.दीपक पाटील, डॉ. सारिका पाटील, डॉ. अनघा चोपडे तर जनसंपर्क प्रमुख विनोद जैन आणि मावळते अध्यक्ष डॉ.शशिकांत गाजरे, डॉ. भरत बोरोले यांचा समावेश आहे.

# धरणगावात श्री संत सावता महाराज फुल माळी समाज बहुउद्देशीय सभागृहाचे उद्घाटन

प्रतिनिधी । धरणगाव



समाजाने संघटीत होवून नव्या पिढीच्या विकासाचा आणि प्रगतिचाच उद्देश डोळ्यासमोर ठेवावा. तेच कार्य श्री सावता महाराज फुल माळी समाज बहुउद्देशीय सभागृहात होईल, असा विश्वास ना. गुलाबराव पाटील यांनी व्यक्त केला. त्यांच्या विशेष निधीतून बांधण्यात आलेला श्री संत सावता महाराज फुल माळी समाजाचे बहुउद्देशीय सभागृहाचे उद्घाटन पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. तेव्हा ते बोलत होते. प्रमुख अतिथी म्हणून नगराध्यक्षा लीला चौधरी व उपनगराध्यक्षा सुरेखा महाजन उपस्थित होत्या. कार्यक्रमाला शिवसेना उपनेते गुलाबराव वाघ, माळी समाजाचे माजी अध्यक्ष विठोबा महाजन, माळी समाजाचे नेते तथा माजी नगराध्यक्ष ज्ञानेश्वर महाजन, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष संजय महाजन, कैलास माळी, माळी समाजाचे उपाध्यक्ष निंबाजी महाजन व गोपाल महाजन यांची विशेष उपस्थिती होती. बांधकामासाठी जागा देणारे वाय. डी. महाजन यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

# सेवानिवृत्त बँक अधिकारी डी.बी.पाटील यांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान

प्रतिनिधी । चोपडा

**जे.डी.सी.सी.बँकेतील कार्यकाळात एक अत्यंत सहकार्यशील अधिकारी म्हणून समाज व समाजेतर तालुकावासियांना सुपरिचित गरताडकर डी.बी.पाटील (निवृत्त माजी विभागीय व्यवस्थापक जिल्हा बँक शाखा चोपडा) यांना सपत्नीक छाया पाटील तुबा नाज हेल्प मल्टिपर्पज सोसायटी ता.यावल संस्थेचा पंडित जवाहरलाल नेहरू राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे .**



खान्देशात विधायक सेवाकार्यासाठी नावलौकिक प्राप्त अमर संस्थेचे संचालक तसेच समस्त दोडे गुर्जर समाज संस्थान जळगावचे विश्वस्त मंडळ सदस्य असलेले डी.बी. पाटील यांच्या आतापर्यंतच्या एकूणच सहकार्यशील कार्याची नोंद घेत त्यांना त्यांच्या गौरवार्थ हा ४ था पुरस्कार संस्थेतर्फे मनोज देशमुख उपजिल्हाधिकारी -सरदार सरोवर प्रकल्प नंदुरबार व अनेक मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार सपत्नीक वितरण करण्यात आला. कार्यक्रमात पंडित जवाहरलाल नेहरू राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. याबद्दल त्यांचेवर जिल्हाभरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# अमळनेर युवासेनेची नूतन कार्यकारिणी जाहीर


प्रतिनिधी । अमळनेर

**शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन तसेच शिवसेना मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व संसदरत्न खा. श्रीकांत शिंदे, युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक, युवासेना सचिव किरण साळी यांच्या आदेशाने युवासेना जिल्हाप्रमुख रोहित कोगटा यांनी युवासेनेची नूतन कार्यकारिणी जाहीर केली.**



तालुकाप्रमुखपदी राहुल भास्कर कंजर, विधानसभा क्षेत्र प्रमुखपदी पंकज संतोष शेटे, शहर प्रमुख प्रविण पुरुषोत्तम पाटील, उपशहरप्रमुख करण सुपडू चव्हाण, शेख अल्ताफ राजा फारुख, तुषार महेंद्र सोनार, शहर संघटक राकेश रविंद्र लांडगे, उपशहर संघटक यश मोहन साळुंखे, कॉलेज कक्ष प्रमुख शंतनु शामकांत भावसार, कॉलेज कक्ष सचिव गौरव रविंद्र पाटील, सोशल मीडिया प्रमुखपदी खेमचंद सूर्यवंशी यांची नियुक्ती करण्यात आल्याचे युवासेना जिल्हाप्रमुखांच्या सहीचे पत्र कार्यालयातून प्राप्त झाले. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील, माजी आ. शिरीष चौधरी, आ.किशोर पाटील, आ.अमोल पाटील, आ.चंद्रकांत सोनवणे, आ.चंद्रकांत पाटील, माजी खा.उन्मेश पाटील, जिल्हाप्रमुख वासुदेव पाटील, महिला आघाडीच्या विभागीय प्रमुख सरिता माळी तसेच नगराध्यक्ष डॉ.परिक्षीत बाविस्कर, शिवसेना तालुका प्रमुख गुलाब पाटील, उपजिल्हाप्रमुख प्रथमेश पवार, विधानसभा क्षेत्रप्रमुख सुरेश पाटील, शहर प्रमुख भरत पवार, विलास कंखरे यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# महावीर जयंतीनिमित्त वर्डी विद्यालयात विशेष फलक लेखन




प्रतिनिधी । चोपडा

तालुक्यातील वर्डी येथील स्वा.सै.श्री.शामराव गोविंदा पाटील माध्यमिक विद्यालयात वर्धमान महावीर जयंतीनिमित्त मुख्य फलकावर विशेष चित्र साकारण्यात आले. हे फलक लेखन कलाशिक्षक भुषण सानप सर यांनी केले आहे.या उपक्रमामुळे विद्यालयात प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले. मुख्याध्यापक मोहन चव्हाण, पर्यवेक्षक आर.बी. साळुंखेंनी उपक्रमाचे कौतुक केले.

# मनसे जिल्हाध्यक्ष गजानन राणे संघटना बांधणीसाठी चोपडा तालुक्यात

प्रतिनिधी । चोपडा

**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जळगाव जिल्हा संपर्क अध्यक्ष गजानन राणे रावेर लोकसभा मतदारसंघाच्या दौऱ्यावर असून, या दौऱ्यादरम्यान संघटना बांधणीला मोठा वेग आला आहे. या दौऱ्याचा एक भाग म्हणून धानोरा (ता.चोपडा) गावात मनसेच्या वतीने भव्य सदस्य नोंदणी कार्यक्रम उत्साहात पार पडला.**



यावेळी गजानन राणे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, राज साहेबांचे विचार घराघरात पोहोचवण्यासाठी आणि स्थानिक युवकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी मनसेची ही सदस्य नोंदणी मोहीम अत्यंत महत्त्वाची आहे. रावेर लोकसभा मतदारसंघात मनसेचे संघटन अधिक मजबूत करण्यावर आमचा भर आहे.

या कार्यक्रमाप्रसंगी जळगाव मनसे जिल्हाध्यक्ष अ‍ॅड.जमील देशपांडे यांनी कायदेशीर आणि संघटनात्मक बाबींवर मार्गदर्शन केले.

तसेच रावेर लोकसभा मनविसे (विद्यार्थी सेना) जिल्हाध्यक्ष कल्पेश पवार यांनी युवकांच्या सहभागावर जोर दिला. या कार्यक्रमाला जिल्हा संपर्क अध्यक्ष गजानन राणे यांच्यासह जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. जमील देशपांडे, मनविसे जिल्हाध्यक्ष कल्पेश राजेंद्र पवार, किरण तळेले, कल्पेश खैरनार, मनसे ग्रामपंचायत सदस्य लीला विशाल महाजन, विशाल महाजन,विष्णू कोळी,चैतन्य महाजन,महेंद्र पाटील आणि गावातील असंख्य तरुण व कार्यकर्ते उपस्थित होते. धानोरा येथील ग्रामस्थांनी आणि तरुणांनी मोठ्या संख्येने मनसेमध्ये प्रवेश करून नोंदणी मोहिमेला प्रतिसाद दिला. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मनसेची ही सक्रियता चोपडा विधानसभा मतदारसंघात चर्चेचा विषय ठरत आहे.

# चोपड्यात विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी व्याकरणावर खुली परीक्षा

## रिलाएबल क्लासेसचा उपक्रम... सायकल, स्मार्टवाचसह विविध बक्षिसे जाहीर

प्रतिनिधी । चोपडा

**येथील हनुमंत पाटील संचलित रिलाएबल इंग्लिश क्लासेस तर्फे दि ३१ मार्च मंगळवार रोजी सकाळी ८:३० ते १०:३० वाजे दरम्यान रिलाएबल इंग्लिश क्लासेस, परेश डेअरी समोर, पंकज नगर. व रिलाएबल इंग्लिश क्लासेस, पांचाळेश्वर गल्ली, चोपडा या दोन्ही ठिकाणी इ. ४ थी च्या विदयार्थ्यांसाठी इंग्लिश व इंग्लिश ग्रामरफया विषयांवर आधारित १०० गुणांचा पेपर घेण्यात येत आहे.गुणवंत विदयार्थ्यासाठी विविध आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहेत.**




या परिक्षेत प्रथम येणा-यास सायकल, ट्रॉफी व प्रमाणपत्र, व्दितीय येणाऱ्यास स्मार्ट वाच, ट्रॉफी व प्रमाणपत्र व तृतीय येणा-यास स्टडी टेबल ट्रॉफी व प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत.

तसेच ज्यांचा प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक येणार नाही त्यांना सुध्दा सहभागाबद्दल प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

हि परिक्षा विनामुल्य असून सर्व ४थी च्या विद्यार्थ्यांसाठी खुली ठेवण्यात आली आहे.परिक्षेत विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेऊन आपली चुणूक दाखवून बक्षीससे पटकाविण्यासाठी नामी संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. ही परीक्षा फक्त सेमी व मराठी मेडीअम साठी आहे.तरी विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे

# नशिराबाद येथे २ एप्रिलला बारागाड्यांसह यात्रोत्सव

प्रतिनिधी । नशिराबाद

**दोनशे वर्षांची अखंड परंपरा लाभलेला खंडेराव महाराजांच्या यात्रोत्सवास यंदा गुरुवार, दि.२ एप्रिलपासून उत्साहात सुरू होणार असून चार दिवस विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी नशिराबाद नगरी दुमदुमणार आहे. परंपरागत बारागाड्या ओढण्याचा थरार हा यात्रेचे मुख्य आकर्षण ठरणार आहे.**

सुनसगाव रस्त्यावरील प्राचीन खंडेराव महाराज मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही मंदिर समितीतर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार दि.२ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता श्रींची पूजा व अभिषेक, सायंकाळी सत्यनारायण पूजा होणार आहे. शुक्रवार दि.३ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता महाअभिषेक व पूजन होईल. दुपारी ४ वाजता कठडे मिरवणूक काढण्यात येणार असून सायंकाळी ५ वाजता भगत युवराज धोबी यांच्याहस्ते परंपरागत बारागाड्या ओढण्याचा सोहळा पार पडेल. रात्री ९ वाजता प्रियाबाई रावेरकर लोकनाट्य नृत्य मंडळाचा कार्यक्रम रंगणार आहे. शनिवार ४ एप्रिल रोजी सकाळी पंचामृत अभिषेक व पूजन होईल. रात्री ९ वाजता शिव मल्हार जागरण गोंधळ पार्टी, चंदनपुरी यांचा कार्यक्रम होणार आहे.